**प्रस्तावना :- घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी नवीन निविदा अंतीम होई पर्यंत सद्यस्थितीत कार्यरत ठेकेदार यांना मुदतवाढ देणे बाबत व त्यासाठी होणाऱ्या अतिरिक्त खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची प्रशासकिय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.**

**मे. सविनय सादर,**

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.१५/०३/२०२४ प्रशासकिय ठराव क्र.४२१ अन्वये दिलेल्या मंजुरीनुसार प्रभाग समिती क्र.१ ते ५ करिता नियुक्त ठेकेदार यांचा कार्यादेशाचा ५ महिन्याचा कालावधी दि.१४/०८/२०२४ रोजी संपुष्टात आल्याने दि.०७/०८/२०२४ रोजी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दिलेल्या मान्यतेनुसार प्रशासकिय ठराव क्र.४८४, दि.१४/०८/२०२४ अन्वये सद्यस्थितीत कार्यरत ठेकेदार यांना दि.३१/०८/२०२४ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी नवीन निविदा प्रक्रिया राबविणेसाठी तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असुन निविदा प्रक्रिया अंतीम होई पर्यंत सद्यस्थितीत कार्यरत ठेकेदार यांना मुदतवाढ देणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.३०/०८/२०२४ रोजी मंजुरी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने कचरा संकलन व वहन करणेकामी सद्यस्थितीत कार्यरत ठेकेदार यांना दि.०१/०९/२०२४ पासुन नवीन निविदा अंतीम होई पर्यंत मुदतवाढीचे कार्यादेश देणेकामी व त्यासाठी एकुण मासिक अंदाजे रु.२.४५ कोटी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मंजुरी मिळणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांचा प्रशासकिय ठराव घेणेस विनंती आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** ५०२ दि. ३०/०८/२०२४

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी सद्यस्थितीत कार्यरत ठेकेदार यांना नवीन निविदा अंतीम होई पर्यंत मुदतवाढीचे कार्यादेश देणेकामी व त्यासाठी एकुण मासिक अंदाजे रु.२.४५ कोटी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मंजुरी मिळणेकामी विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व वहन करणेकामी दि.३०/०८/२०२४ रोजी दिलेल्या मंजुरीनुसार प्रभाग समिती क्र.१ ते ५ निहाय सद्यस्थितीत कार्यरत ठेकेदार यांना दि.०१/०९/२०२४ पासुन नवीन निविदा अंतीम होई पर्यंत मुदतवाढीचे कार्यादेश देणेकामी व त्यासाठी एकुण मासिक अंदाजे रु.२.४५ कोटी येणाऱ्या खर्चास तसेच आवश्यकते नुसार बदल करणे कामी अधिकार राखुन ठेवुन यासाठी उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देणेत येत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त,**
O/C **भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**92-PC- MY DOC - 2024 (NEW SOLID WASTE TENDER - 2024)**